## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.११ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दृष्टी बाधित दिव्यांगासाठी रुसा समावेशी शिक्षण संसाधन केंद्रात सहयोगी तंत्रज्ञान व संगणक हाताळणी या विषयावर आयोजित सात दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

या कार्यक्रमासाठी प्रशिक्षणार्थींना व्हाईट केन देणगी देणाऱ्या श्री.संजय सपकाळे यांचा सत्कार कुलगुरुंच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीस केंद्राचे समन्वयक डॉ.राम भावसार यांनी कार्यशाळेचा आढावा सादर केला. त्यानंतर प्रशिक्षणार्थी दिव्यांग विद्यार्थी विनय वाघ व सुवर्णा पाटील यांनी अभिप्राय व्यक्त केला. यावेळी कुलगुरु प्रा.पाटील यांनी विद्यापीठाने दिव्यांगासाठी मोफत उपलब्ध करुन दिलेल्या सुविधेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले व सहयोगी तंत्रज्ञानाचा वापर करुन संगणक व इंटरनेट हाताळणीत अधिक कौशल्य मिळवून सक्षम व स्वावलंबी बनावे असे आवाहन केले व सव्यांग व दिव्यांग घटकांमधील दरी कमी झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक विकास होऊ शकत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र व व्हाईट केनचे वितरण करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान प्रशिक्षणार्थीचे समुपदेशन व व्यक्तिमत्व चाचणी घेण्यात आली. तसेच परीक्षे दरम्यान दिव्यांग विद्यार्थ्यांना येणाऱ्या शंकांचे निरसन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा.दीपक सोनवणे यांनी केले. सदरील प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी श्री.विजय आहेर तसेच केंद्राचे स्वयंसेवक दिव्या बोरसे व मयुर पाटील यांनी परिश्रम घेतले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ११ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेअंतर्गत येणाऱ्या अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, डॉ.आंबेडकर विचारधारा, मानसशास्त्र, स्त्री अभ्यास केंद्र आणि समाजकार्य या विषयांच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळाव्याचे आयोजन दि.१२ जानेवारी, २०१९ रोजी करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाला औरंगाबाद येथील श्री.दीपक भिंगारदेव हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.एस.टी.इंगळे हे राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. सदरच्या कार्यक्रमाला माजी विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या संचालिका डॉ.अर्चना देगांवकर यांनी केले आहे.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि. ११ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत नॅक, बंगळूर यांच्याकडून मूल्यांकन/ पुर्नमूल्यांकन केलेले नाही, अशा महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्यासाठी नॅक, बेंगलोर यांच्या विद्यमाने विद्यापीठामार्फत दि. १७ व १८ जानेवारी, २०१९ रोजी दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेसाठी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व आय.क्यू.एस.सी. समन्वयक यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. या कार्यशाळेला नॅक, बंगळूर यांनी नियुक्त केलेले व इतर विषयतज्ज्ञ मूल्यांकन / पुर्नमूल्यांकनाच्या नवीन पध्दती संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही.

तरी ज्या महाविद्यालयांनी मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन केलेले नसेल त्यांनी लवकरात लवकर सदर कार्यशाळेसाठी नोंदणी करावी असे प्रा.एस.टी.इंगळे, आय.क्यू.ए.सी.संचालक यांनी आवाहन केले आहे.

---

**बातमी क्र.४**

जळगाव दि.११ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा २७ वा दीक्षांत समारंभ ९ फेब्रुवारीला होणार असून ज्या स्नातकांनी पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळण्यासाठी आवेदन पत्र जमा केले आहेत अशा पात्र स्नातकांची यादी लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाणार आहे.

९ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता हा कार्यक्रम विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात होणार आहे. ऑनलाईन आवेदन पत्र भरलेल्या स्नातकांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असून दीक्षांत समारंभाच्या दिवशी जे स्नातक उपस्थित राहून पदवी गृहण करणार आहेत, त्यांना त्यांच्या पदवी/पदविका प्रमाणपत्र क्रमांकाच्या सहाय्याने प्रमाणपत्र वितरीत केले जाईल. अनुपस्थित स्नातकांना कालांतराने त्यांच्या पत्त्यावर प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहे. या समारंभाविषयीची माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली आहे.

==२==

**बातमी क्र.५**

**विद्यापीठात बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी दि. १२ ते १५ जानेवारी रोजी**

जळगाव दि.११(  ) महाराष्ट्र शासनाने शिक्षक पदांच्या सरळसेवा भरती संदर्भात सुधारित बिंदूनामावली विद्यापीठामार्फत तपासून देण्याचा कार्यक्रम जाहिर केला असून १२ ते १५ जानेवारी दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयांची बिंदूनामावली तपासणी होणार आहे. यासंदर्भात विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

शिक्षकपदांच्या सरळसेवा भरतीसंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय दि.५ डिसेंबर २०१८ रोजी निर्गमित केलेला आहे. त्यात सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Class) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. यासंदर्भात दि.०७/०१/२०१९ रोजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत मुंबई येथे बैठक झाली. त्यात  बिंदूनामावली व पदभरतीसंदर्भात चर्चा झाली असून त्याअनुषंगाने बिंदूनामावली त्वरीत तपासून घेण्याबाबत विद्यापीठात प्राचार्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस कुलसचिव भ.भा. पाटील यांनी संबोधित केले.

**बिंदूनामावलीसंदर्भात रोस्टर तपासणी कार्यक्रम :**

यासंदर्भात अनुदानित महाविद्यालयाने बिंदूनामावली  रजिस्टर  तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग जळगाव यांनी दि. १/१०/२०१७ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून दिलेल्या पत्राची प्रत  तसेच आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यापीठात बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी एस.सी.ॲण्ड एस.टी. विभागाकडून  पुढील वेळापत्रकानुसार तपासून दिली जाणार आहे. दि. १२ जाने. रोजी  धुळे शहर व धुळे जिल्ह्यातील महाविद्यालये.  १३ जाने.  रोजी जळगाव शहर, चाळीसगाव, पारोळा, चोपडा, अमळनेर, दि. १४ जाने. रोजी  जळगाव जिल्ह्यातील उर्वरित सर्व अनुदानित महाविद्यालये व दि. १५ जाने.  रोजी नंदुरबार शहर व जिल्ह्यातील सर्व अनुदानित महाविद्यालये. यासाठी संबंधितांनी उपस्थित रहावे. याबाबत सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

तरी सर्व अनुदानित महाविद्यालयांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे आवाहन कुलसचिवांनी केले आहे.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- ११ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
( डॉ.सुनील पाटील )<br>
जनसंपर्क अधिकारी